**प्रेसनोट दि. १६/०७/२०१९**

**दामिनी मार्शल भरोसा सेल , गुन्हे शाखा पुणे शहर**

**हरवलेल्या मुलीला आईच्या सुखरुप ताब्यात दिलेबाबत...**

दामिनी मार्शल स्वारगेट /लष्कर म पो ना भालेराव ,मपोशि रणसींग असे मिळुन दि. १३/०७/२०१९ रोजी १९/३० च्या सुमारास हद्दीमध्ये पेट्रोलींग करत असताना स्वारगेट बस स्टॉप महिला नामे रंजना प्रकाश शिंदे वय ३० वर्षे रा कात्रज हि महिला स्वारगेट येथे रडत असताना दिसली. तिची चौकशी करुन परिस्थिती जाणुन घेवुन त्याची मुलगी सोनाली हि करमाळा येथे मामाकडे शिक्षणासाठी असल्याचे समजले. सोनाली हि शाळेत गेली ती परत अली नाही.मामाने तीचा शोध घोतला ती सापडली नाही.त्यांच्या शेजारील व्यक्तीने सांगितले की,मला सोनाली करमाळा एस टी स्टँडवर दिसली ,त्यावेळी तीने आई कडे जाणार असल्याचे सांगितले,अशी माहिती मिळताच स्वारगेट एस.टी. स्थानक प्रमुखांशी संपर्क साधुन,करमाळ्याकडुन येणारी एस.टी. कधी येते याची माहिती घेतली. करमाळ्याहुन पुणे एस टी बस १४/०० वा निघते,ती पुण्यात १८/०० च्या सुमारास येते. १९/१५ वा च्या सुमारास सोनाली हि मिळुन आली. तिची विचारपुस केली असता.ती करमाळ्यावरुन आली असल्याचे सांगीतले. आई सोमवारी भेटायला येणार होती. पण मला आईला भेटायचे होते. म्हणुन घरातुन निघुन आले. सगर मुलीस एस टी मधुन उतरवुन तीच्या आईच्या सुखरुप ताब्यात दिली.

